# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**सावली (जि.चंद्रपूर) येथे न्यायालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणेबाबत**

**(१) ५४३३ (०६-०४-२०१५). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावली (जि.चंद्रपूर) येथे दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे कामकाज अनेक वर्षापासून भाडयाच्या जागेमध्ये सुरु असून कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने सदर जागा अडचणीची आहे. सदर इमारत लहान असल्यामुळे न्यायालयाचे प्रशासकीय कामकाज करीत असतांना अनेक अडचणी निर्माण होत असल्यामूळे कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने सावली येथे न्यायालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे बांधकाम करण्यासाठी निधीसह मंजूरी दयावी अशी मागणी नागरिकांसह लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री महोदय व प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २८ जानेवारी २०१५ च्या सुमारास केलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१५) :** (१) (२) व (३) होय. तथापि सावली येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाच्या विचाराधीन आहे.

मा.उच्च न्यायालयाकडून सदरहू प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

---

**ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथे न्यायालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणेबाबत**

**(२) ५४३४ (०६-०४-२०१५). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथे १९१९ वर्षा पुर्वी बांधलेल्या इमारतीमध्ये न्यायालयाचे प्रशासकीय कामकाज सुरु आहे. सदर इमारत ९५ वर्ष जुनी झाल्यामुळे न्यायालयाचे प्रशासकीय कामकाज करीत असतांना अनेक अडचणी निर्माण होत असून इमारत नादुरुस्त असल्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने ब्रम्हपूरी येथे न्यायालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे ब्रम्हपूरी येथील न्यायालयाच्या नविन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यासाठी निधीसह मंजूरी दयावी अशी मागणी नागरिकांसह लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री महोदय व प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २८ जानेवारी २०१५ च्या सुमारास केलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रम्हपूरी येथील न्यायालयाच्या नविन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१५) :** (१) व (२) होय.

तथापि ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव सद्यःस्थितीत मा.उच्च न्यायालयाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथील कार्यालये सावली येथे स्थानांतरीत करण्याबाबत

**(३) ५४४६ (१०-०४-२०१५). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथे दोन सार्वजनिक बांधकाम उपविभागाने दोन कार्यालय असल्यामुळे त्यापैकी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क-२ हे कार्यालय सावली येथे स्थानांतर करुन कार्यकारी अभियंता, सा.बां.रोहयो, चंद्रपूर यांना जोडण्यात यावे अशी मागणी करणारे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी अप्पर मुख्य सचिव आणि सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१४ आणि जानेवारी, २०१५ च्या सुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सावली येथे उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग हे कार्यालय सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०५-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, चंद्रपूर यांच्या दि. ६.४.२०१५ च्या आदेशान्वये सा.बां.उपविभाग सावली येथे स्थानांतरीत करण्यात आला आहे.

---

**चंद्रपूर एम.आय.डी.सी. मध्ये बंद उद्योगांना कोल लिकेजचा कोळसा पुरविण्यात येत असल्याबाबत**

**(४) ५४४८ (१०-०४-२०१५). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या पाच वर्षापासून चंद्रपूर एम.आय.डी.सी. मध्ये बंद उद्योगांना कोल लिकेजचा कोळसा पुरविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाची दिशाभूल करुन या बंद पडलेल्या उद्योगासाठी मंजूर असलेल्या कोल लिकेज कोळसा अधिका-यांच्या संगनमताने खुल्या मार्केटमध्ये विकल्याने करोडो रुपयांचा गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे काय व त्यात काय निदर्शनास आले,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०५-२०१५) :** (१) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून सन २००९-१० ते सन २०११-१२ या कालावधीत तसेच महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांच्याकडून सन २०१२-१३ ते सन २०१३-१४ या कालावधीत चंद्रपूर एम.आय.डी.सी. मध्ये बंद उद्योगांना कोल लिंकेजचा कोळसा पुरविण्यात आलेला नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावली (जि. चंद्रपूर) येथे उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग आणि उपविभागीय अभियंता, जिल्हा सिंचाई उपविभाग हे नविन कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(५) ५४६९ (०६-०४-२०१५). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सावली येथे उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग आणि उपविभागीय अभियंता, जिल्हा सिंचाई उपविभाग हे नविन कार्यालय सुरु करण्यासाठी नागपूर येथिल हिवाळी अधिवेशन २०१४ च्या दरम्यान तारांकित प्रश्न उपस्थित

केले असता त्यावर ग्रामविकास मंत्री महोदयांनी लवकरच सावली येथे कार्यालय सुरु करण्यात येईल असे आश्वासन सभागृहात दिले होते खरे आहे काय,
(२) असल्यास सावली येथे उपविभागीय अभियंता, जिल्हापरिषद बांधकाम उपविभाग आणि उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद सिंचाई उपविभाग हे नविन कार्यालय सुरु करण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय क्र.रागांप.-२०१४/प्र.क्र.१४२/योजना-४ दिनांक १ ऑगस्ट, २०१४ द्वारे राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांतर्गत ग्राम पंचायत स्तरावर पंचायत अभियंता (प्रति ग्रामपंचायत) व गट अभियंता (प्रति पंचायत समिती) ही पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने निर्माण करण्यात आलेली पदे विचारात घेऊन तसेच जिल्हा परिषदांकरिता उपलब्ध विभाग/उपविभाग, तांत्रिक मनुष्यबळ व कार्यभार विचारात घेऊ आवश्यक विभाग व उपविभाग निर्माण करण्याच्या जिल्हा परिषदांच्या प्रस्तावांचा आढावा घेऊन सुधारित प्रस्ताव शासन सादर करण्याबाबत दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजी सर्व जि.प.ना कळविण्यात आले अहे. तथापि, १२ जिल्हा परिषदांकडून माहिती प्राप्त झालेली आहे. उर्वरित जिल्हा परिषदांकडून सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक ७ एप्रिल, २०१५ रोजी पुन्हा कळविण्यात आले आहे.

तसेच उर्वरित जिल्हा परिष्देकडून सुधारित प्रस्ताव प्रात झाल्यानंतर नवीन विभाग/उपविभाग व आवश्यक कर्मचारीवृंद निर्माण करण्याचा प्रस्ताव उच्चस्तरीय समिती समोर ठेवण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील आदिवासी शेतकरी यांना विद्‌युत पुरवठा वेळेवर व नियमित होत नसल्याबाबत**

**(६) ५५०६ (०४-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील आदिवासी शेतकरी बारामाही शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून असून त्यांना विद्‌युत पुरवठा वेळेवर व नियमित होत नसलयामुळे शेतीसाठी पाणी मिळत नसल्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान हात असल्याने आदिवासी शेतक-यांना नियमित वेळे वर वीज पुरवठा होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उर्जा मंत्री याना दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्सायुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदिवासी शेतक-यांना वीज पुरवठा खंडीत न करता ९'०० ते ५'०० (आठ तास) या वेळेत करण्याकरीता शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्‌याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०५-२०१५) :** (१) होय.
(२) ११ के.व्ही अलवंड व ११ के.व्ही. पेगलवाडी या स्वतंत्र कृषी वाहिन्यांद्‌वारे व ११ के.वही. वावीहर्ष मिश्र कृषि वाहिनीद्‌वारे वीज पुरवठा करण्यात येतो.

स्वतंत्र कृषी वाहिन्यांवर महावितरणच्या धशोरणानुसार रात्री १० तास व दिवसा ८ तास चक्राकार पध्दतीने वीज उपलब्धता देण्यात येते. तसेच ११ के.व्ही. वावीहर्ष मिश्र कृषि वाहिनीवर भारनियमनाच्या परीपत्रकाप्रमाणे १३ तास भारनियमन व ११ तास वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेच्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या पाहणीत अंबड येथील औघोगिक वसाहतील डेंग्युच्या अळ्या आढळून आल्याबाबत

**(७) ५५१२ (०६-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे महानगरपालिकेच्या नवीन विभागातील कार्यालयाकडून माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास करण्यात आलेल्या पाहणीत अंबड औद्‌योगिक वसाहतीतील कंपन्यात मोठ्या प्रमाणात डेंग्युच्या अळ्या आढळून आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डेंग्यूच्या अळ्या आढळून आलेल्या कंपन्यावर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच डेंग्युच्या अळ्याग्रस्त कंपन्याचा शोध घेवून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत व पुढे भविष्यात असा गंभीर प्रकार घडू नये यासाठी दक्षता घेण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१५) :** (१) व (२) नाशिक महानगरपालिकेने माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये केलेल्या पाहणीमध्ये अंबड औद्‌योगिक वसाहतीमधील काही कंपन्यांच्या आवारातील पाणीसाठा दूषीत झाल्याचे तसेच त्यामध्ये डासांच्या आळ्या असल्याचे आढळून आले. त्यानुषंगाने मे.किर्लोसकर ऑईल इंजिन्स व अॅशग्राफ या दोन कंपन्यांना महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात आली तसेच पॅपिलॉन डिसप्रेस या कंपनीला रु.५०००/- इतका दंड आकारण्यात आला.

डास नियंत्रणांच्या अनुषंगाने दुषीत पाण्याचा उपसा करणे, औषध फवारणी करणे, धूर फवारणी करणे, जनागृती करणे. नाल्यामध्ये किरकोळ अभियांत्रिकी उपाययोजना करुन डासांची उत्पत्ती होणार नाही, याची आवश्यक ती दक्षता नाशिक महानगरपालिकेकडून घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विल्होळी (जि.नाशिक) शिवारातील देव ॲग्रो फुडस् या गोदामातील धान्य तहसिलदारांनी जप्त केल्याबाबत**

**(८) ५५१३ (०७-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विल्होळी (जि.नाशिक) शिवारातील देव ॲग्रो फुडस् या गोदामात तहसीलदारांनी जप्त केलेल्या धान्याची ज्या ट्रकमधून वाहतूक करण्यात आली त्या ट्रकचालकासह मालकावरही नाशिक तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती रेशन दुकानदार व संबंधित दोषी आढळून येणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी संबंधीतांविरुध्द नाशिक (ग्रामीण) या तालुका पोलिस स्टेशनमध्ये गु.र.क्रमांक १२/२०१४, दिनांक १० डिसेंबर, २०१४ प्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, ३ रास्तभाव दुकाने जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या दिनांक १३ जानेवारी २०१५ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आली. या प्रकरणी शासनास असलेल्या अर्धन्यायिक अधिकाराअंतर्गत संबंधितांनी पुनरीक्षण अर्ज दाखल केले होते. त्याअनुषंगाने शासनातर्फे अर्धन्यायीक अधिकारांतर्गत कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

---

**नाशिक जिल्ह्यात तसेच सुरगाणा व मालेगाव तालुक्यामध्ये स्वस्त धान्याचा होत असलेला काळाबाजार**

**(९) ५५१६ (०७-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात तसेच सुरगाणा तालुक्यातील स्वस्त धान्य शिधावाटप दुकानातील लाभार्थ्यांचे धान्य थेट काळयाबाजारात विकत असल्यानेच अनेक लाभार्थी या धान्याच्या लाभापासून वंचित राहत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले व सदर जिल्ह्यात पुरवठा विभागामध्येही मोठ्या प्रमाणात धान्याचा काळाबाजार होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच मालेगाव (जि.नाशिक) येथे धान्य, रॉकेल, साखरेचा गैरव्यवहार सुरु असल्याने तेथील नागरिकांनी बरीच आंदोलने केली व शासन निर्णयानुसार पुरवठा विभाग धान्य वाटप करीत नसल्याने दारिद्रय रेषेखालील नागरिक लाभांपासून वंचित राहत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्नसुरक्षा योजनेपासून हजारो लाभार्थी वंचित राहत असल्यामुळे शासनाने गैरव्यवहार करणाऱ्या शिधावाटप दुकानांची तसेच संबंधितांची चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :** (१) नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा येथील शासकीय गोदामातील धान्याचा वाहतूक ठेकेदार, गोदामपाल, वाहतुक प्रतिनिधी यांनी संगनमताने अपहार केल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आलेली आहे.

(२) मालेगांव, जि. नाशिक येथे धान्य, रॉकेल, साखरेचा गैरव्यवहार होत असल्याची व दारिद्रय रेषेखालील नागरिक लाभांपासून वंचीत रहात असल्याची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही. अन्न सुरक्षा योजनेंतर्गत प्राधान्य कुटुंब गटात समाविष्ट न होणाऱ्या ३६३५२४ ए.पी.एल. शिधापत्रिका धारक लाभार्थ्यांना पूर्वीप्रमाणेच सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ माहे ऑक्टोबर, २०१४ पावेतो देण्यात आला आहे. परंतु माहे नोव्हेंबर, २०१४ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत पात्र लाभार्थ्यांमध्ये समाविष्ट न झालेल्या ए.पी. एल. लाभार्थ्यांना सदर अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देता आला नाही.

(३) सदर अपहारात प्रथमदर्शनी सहभागी आढळून आलेले गोदामपाल, सुरगाणा, वाहतुक ठेकेदार व त्यातील भागीदार, वाहतुक प्रतिनिधी, नाशिक रोड/अंबड, पुरवठा निरीक्षक व तहसिलदार, सुरगाणा यांचेविरुध्द सुरगाणा पोलीस स्टेशन, सुरगाणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर अपहार प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी (१), नायब तहसिलदार

(१), संबंधित अव्वल कारकून (२), संबंधित लिपीक (१), गोदामपाल, वाहतूक प्रतिनिधी, पुरवठा निरिक्षक व तहसिलदार, सुरगाणा यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विभागीय चौकशीच्या प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु आहे. अपहारासंबंधित लेखाधिकारी व सहायक लेखाधिकारी तसेच तहसिलदार सुरगाणा व्यतिरिक्त अन्य तहसिलदार संवर्गातील इतर ७ अधिकाऱ्यांना तातडीने निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित विभागाकडे पाठविण्यात आला आहे. सदर अपहारात सहभागी असलेले वाहतूक ठेकेदार मे.एस.एन.मंत्री यांचे कंत्राट निलंबित करण्यात आलेले असून सदर वाहतूक कंत्राटास दिलेली मुदतवाढ दिनांक ०६.०२.२०१५ पासून संपुष्टात आणलेली आहे. अपहारास प्रत्यक्ष जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांकडून अपहारित धान्याची रक्कम ईकॉनॉमिक कॉस्टने वसूल करण्याचे लेखी निर्देश जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सौरउर्जेवर चालणारे कृषीपंप बसविण्याचे धोरण मा.मुख्यमंत्री यांनी घोषीत केल्याबाबत

**(१०) ५५५७ (०४-०४-२०१५). श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. राहुल मोटे (परांडा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सौरउर्जेवर चालणारे कृषीपंप बसविण्याचे धोरण मा.मुख्यमंत्री यांनी घोषीत करण्यात येवून दरवर्षी पाच लाख सौर कृषीपंप बसविण्याची महत्वाकांक्षी योजनाही जाहिर केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये व त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सौरकृषीपंपासाठी सन २०१५ च्या अर्थसंकल्पाच्या अधिवेशनात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे काय व किती आर्थिक तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, लवकरात लवकर सौरकृषीपंप बसविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०५-२०१५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात तरतुद उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु झाली असून सध्या रुपये १५५.७५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. उर्वरीत निधी महावितरणने कर्जाद्वारे उपलब्ध करुन घ्यावयाचा आहे.

(३) दि.५ मे, २०१५ रोजी याप्रकरणी सुकाणू समितीची बैठक होऊन त्यामध्ये टेंडर समिती व तांत्रिक समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समित्यांमार्फत पुढील कार्यवाही करण्यात यावयाची आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील कोयना अभयारण्याच्या क्षेत्रात बेकायदेशीर उभारण्यात आलेल्या २१५ पवनचक्क्या आणि १० रिसॉर्टस**

**(११) ५५९५ (०६-०४-२०१५). श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. शंभुराज देसाई (पाटण), श्री. चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कोयना अभयारण्यात बेकादेशीर उभारलेल्या २१५ पवन चक्क्या व १० रिर्सोटला सेंट्रल एम्पपॉवर्ड समितीने ३५ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पवन चक्की प्रकल्पाच्या व रिर्सोटच्या मालकांनी सदरचा दंड रद्द व्हावा याकरिता सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते सदरचे अपील सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कोयना अभयारण्यात बेकायदेशीर उभारलेल्या २१५ पवनचक्कया व १० रिर्सोटला सेंट्रल एम्पपॉवर्ड समितीने ठोठावलेला सुमारे ३५ कोटी रुपयांचा दंड वसूल करणेसंदर्भात राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(५) अद्याप राज्य शासनाने यासंदर्भात कोणताही निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०१५) :** (१) कोयना अभण्यारण्यातील २०६ पवनचक्या व ९ रिसॉर्टच्या अवैध कामांबाबत मा.केंद्रीय सशक्तता समितीने दिलेल्या अभिप्रायानुसार नक्त वर्तमान मूल्य जमा करणेचे निर्देशे दिलेले आहेत.
(२) पवनचक्कीधारकांच्या संघटनेने हे नक्त वर्तमान मूल्य रद्द व्हावे याकरिता सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. सदर अपील फेटाळण्यात आलेले आहे.
(३), (४) व (५) केंद्रीय सशक्तता समितीने आकारलेले नक्त वर्तमान मूल्य ३ महिन्यांच्या आत भरण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १६.०१.२०१५ रोजी दिले होते. त्याअनुषंगाने आतापर्यंत १९१ पवनचक्कीधारकांनी व ६ रिसॉर्ट मालकांनी नक्ल वर्तमान मूल्याची रक्कम जमा केली असून उर्वरीत पवनचक्कीधारक व रिसॉर्ट मालकांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**हिंगोली ग्राहक तक्रार मंचावर अध्यक्षांची नेमणूक करण्याबाबत**

**(१२) ५६४५ (०७-०४-२०१५). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली ग्राहक तक्रार निवारण मंचावर गत १० वर्षापासून पुर्णवेळ अध्यक्षाची नियूक्ती न केल्याने कामकाज प्रलंबित असून तक्रारदारांना न्याय मिळविण्यासाठी परभणी येथे जावे लागत असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्राहक तक्रार मंचावर अध्यक्षांची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१५-०५-२०१५) :** (१), (२) व (३) मार्च २०१५ अखेर हिंगोली जिल्हा मंचासमोर ३८ प्रकरणे प्रलंबित आहेत. प्रलंबित तक्रारीची संख्या विचारात घेता जिल्हा ग्राहक मंच हिंगोली येथील अध्यक्षपद भरलेले नाही. परंतु परभणी जिल्हा मंचाचे अध्यक्ष, व हिंगोली जिल्हामंचावरील नियुक्त केलेल्या सदस्यांद्वारे हिंगोली जिल्हा मंचाचे न्यायिक कामकाज करण्यात येत आहे.

---

**वाकोडी (कळमनुरी ता.जि.हिंगोली ) येथील जिल्हा प्राथमिक शाळेजवळून ते प्राथमिक आरोग्य केंद्राच्या लाईनवर असलेले विद्यूत तारा जमिनीवर लोंबकळत असल्याबाबत**

**(१३) ५६६४ (०४-०४-२०१५). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (ता.जि.हिंगोली) येथील वाकोडी येथील जिल्हा प्राथमिक शाळेजवळून ते प्राथमिक आरोग्य केंद्राच्या लाईनवर असलेले विद्युत तारा जमिनीवर लोबकळत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागात जि.प.प्रशाला व प्राथमिक आरोग्य केंद्र जवळच असल्याने नागरिकांची, रुग्णांची, विद्यार्थ्यांची ये-जा सुरु असते पण मागील अनेक दिवसापासून या भागात महावितरण कंपनीच्या विद्युत तारा हात लागेल एवढ्या उंचीवर असल्याने संबंधित ये-जा करणा-या नागरीकांना विजेचा धक्का लागून दुर्घटना होण्याची शक्यता असल्याने शासन यावर त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०५-२०१५) :** (१) होय.
(२) मौजे वाकोडी, ता.कळमनुरी येथील जिल्हा परिषद प्रशाला व जि.प. आरोग्य केंद्राजवळील विद्युत तारा लघुदाब विद्युत वाहिनीचा तणाव निसटल्यामुळे लोंबकळत असल्याबाबत दि.०६.०१.२०१५ रोजी निदर्शनास आल्यानंतर तातडीने कळमनुरी शहर वितरण केंद्रामार्फत तणाव व्यवस्थित लाऊन विद्युत तारा ओढून व्यवस्थित उंचीवर घेऊन दुरुस्तीचे काम दि.१०.०१.२०१५ रोजी पुर्ण करण्यात आले.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील पंचायत समिती नांदगांव खंडेश्वर**
**अंतर्गत उर्दू शाळेतील शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१४) ५६७५ (०८-०४-२०१५). प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील पंचायत समिती नांदगांव खंडेश्वर अंतर्गत उर्दू शाळेतील मंजूर १० पदांपैकी ५ शिक्षकांची पदे दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ पासून रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंचायत समिती खंडेश्वर अंतर्गत उर्दू शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडे निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दिलेल्या निवेदनानुसार सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) अमरावती जिल्ह्यातील पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर अंतर्गत एकूण उर्दु शिक्षकांची ४४ पदे मंजूर असून ३९ भरलेली आहेत. रिक्त पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने शिक्षण संचालक पुणे यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**अमरावती जिल्ह्यातील पश्चिम मेळघाट वनविभागाच्या अंतर्गत धारणी येथील कार्यालयातील**
**दुरूस्ती तसेच निवासस्थान दुरूस्ती कामात झालेली प्रचंड अनियमितता**

**(१५) ५६८८ (०६-०४-२०१५). प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील पश्चिम मेळघाट वनविभागाच्या अंतर्गत धारणी येथील कार्यालयातील दुरूस्ती तसेच निवासस्थान दुरूस्ती कामात प्रचंड अनियमितता झाली असून यात प्रचंड भ्रष्टाचार होवून कामे निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे जानेवारी २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणी कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कारवाई होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) एका वृत्तपत्रात सदर कामात अनियमितता झाल्याचे वृत्त प्रकाशीत झाले होते. त्यानुषंगाने चौकशी करण्यात आली. चौकशीत अनियमितता आढळून आलेली नाही.

---

## विक्रीकर संघटना व विक्रीकर न्यायाधिकरण वकील संघटनांनी विक्रीकर विभागाचे कोट्यवधी रुपयांचे भाडे थकविले असल्याबाबत

**(१६) ५७६९ (०६-०४-२०१५). श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगांव येथील विक्रीकर भवनातील जागेत भाडे तत्त्वावर असलेल्या विक्रीकर संघटना व विक्रीकर न्यायाधिकरण वकील संघटनांनी विक्रीकर विभागाचे कोट्यवधी रुपयांचे भाडे थकविले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कोट्यवधी रुपयांचे भाडे वसूलीकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त भाडे वसूली करण्यासाठी व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप याबाबत कारवाई करण्यात आली नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०५-२०१५) :** (१) मुंबईतील माझगांव येथील विक्रीकर भवनातील जागेत भाडे तत्वावर असलेल्या विक्रीकर कर सल्लागार संघटना व विक्रीकर न्यायाधिकरण वकील संघटनांकडे माहे ऑगस्ट-२०१४ अखेर खालीलप्रमाधे भाडे प्रलंबित आहे.-

विक्रीकर सल्लागार संघटना - रु.६६,३९,५४५/-

महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण बार असोसिएशन - २१,४२,९९०/-

संबंधित बाब नोव्हेंबर - २०१४ मध्ये निदर्शनास आलेली नसून, सन २००६ पासून भाडे भरण्याबाबतचा पत्रव्यवहार संबंधित संस्थांकडे केलेला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.
शासनाच्या करवसुलीच्या खात्यांमध्ये जसे की, विक्रीकर (राज्य शासन), आयकर (केंद्रशासन) व करदांते यांच्यात विक्रीकर कर सल्लागार संघटना समन्वयाची भूमिका पार पाडत असतात. शासनाने वेळोवेळी केलेले कायदे व योजना यांची करदात्यांकरवी अंमलबजावणी करुन घेण्यासाठी या संघटनांचा उपयोग होत असतो. प्रश्नांकित संघटनांकडून भाडे वसुलीसाठी एकूण १८ वेळा पत्रे पाठवून पाठपुरावा केलेला आहे. सदर संघटनांनी दि. १७.११.२०१३ रोजीच्या पत्रान्वये या जागा विनाभाडे तत्त्वावर मिळणेबाबत शासनास विनंती केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, ठाणे शिधा क्षेत्रात नियुक्त झालेल्या दक्षता समित्या निष्क्रिय असल्याबाबत**

**(१७) ५७७० (०७-०४-२०१५). श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, ठाणे शिधा क्षेत्रात सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत मिळणाऱ्या शिधा वस्तुंवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केलेल्या दक्षता समित्या निष्क्रिय असून सहा-सहा महिने, वर्षभर दक्षता समित्यांचा बैठका झाल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील शिधावाटप क्षेत्रात शिधापत्रिका व इतर कामांसाठी दलालांकडून खुले आम पैसे घेतले जातात, अशा शेकडो शिधापत्रिकाधारकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे समन्वयक रेशन कृती समिती यांनी दिनांक १५ जानेवारी,२०१५ रोजी वा त्यासुमारास प्रसिध्दी माध्यमांना जाहिर केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने, मुंबई व ठाणे जिल्ह्यातील शिधा दुकाने व कार्यालयातील कारभार पारदर्शक व्हावा, यासाठी कोणती मोहिम राबविण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१५-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. प्रत्येक शिधावाटप कार्यालयाच्या बाहेर व कार्यालयात दलालांची व अन्य मध्यस्थांशी शिधापत्रिकांच्या कामांसाठी संपर्क न करण्याबाबत फलक लावण्यात आलेले आहेत. प्राप्त तक्रारीसंदर्भात शोध घेण्याकरिता परिमंडळ कार्यालय स्तरावर व नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालय स्तरावर कार्यरत असलेले फिरते पथक वेळोवेळी अशा व्यक्ती/दलालांचा शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हे नोंदविते.
(३) मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील शिधावाटप दुकाने व कार्यालयातील कारभार पारदर्शक होण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्याचा प्रकल्प दिनांक ११.३.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दोन टप्प्यात राबविण्यात येणार आहे. टप्पा १ मध्ये

सर्व शिधावाटप कार्यालयातील कामांचे संगणकीकरण व लाभार्थी कुटुंबाला संगणकीकृत शिधापत्रिका देणे या बाबींचा समावेश आहे. टप्पा क्रमांक २ मध्ये अधिकृत शिधावाटप दुकानातील व्यवहारांचे संगणकाद्वारे व्यवस्थापन करण्यात येणार आहे. सर्व परिमंडळ व शिधावाटप कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी, अधिकृत शिधावाटप दुकानांची तपासणी करतात व शिधापत्रिकांची गृहभेटी देऊन पडताळणी करतात. या व्यतिरिक्त अन्नदिन, अन्नसप्ताह व ट्रक ट्रॅकिंग या उपाययोजना राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई - गोवा या राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील होत असलेले अपघात**

**(१८) ५७७३ (१०-०४-२०१५). श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई - गोवा या राष्ट्रीय महामार्ग ६६ वर मोठ्या प्रमाणात लहान - मोठे अपघात होऊन अनेक प्रवासी मृत्यूमुखी पडत असून अनेक प्रवाशी गंभीर जखमी होत असल्याने संबंधित समस्यांविषयी निर्णय घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उक्त महामार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :** (१) होय.
(२) दिनांक २८.०१.२०१५ रोजी पदाधिकारी व अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती व त्याच अनुषंगाने भूसंपादन प्रक्रियेस गती देण्याकरीता दिनांक ५.०२.२०१५ रोजी संबंधित जिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी यांची बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याबाबत सूचना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे जिल्हयातील गावांचा कामधेनु योजनेअंतर्गत समावेश करण्याबाबत**

**(१९) ५८२१ (०४-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दूध उत्पादनवाढीसाठी कामधेनू दत्तक ग्रामयोजने अंतर्गत यवतमाळ जिल्हयातील प्रस्तावीत १३१ गावांपैकी ८० गावांची निवड करण्यात आली असल्याचे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे जिल्हयातील गावांचा कामधेनु योजनेअंतर्गत समावेश करण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) असल्यास सदर तपशील उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०५-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) धुळे जिल्हयात सदरची योजना सन २०१०-२०११ पासुन राबविण्यात येत आहे.
(३) सन २०१०-२०११ मध्ये धुळे जिल्हयातील १६, सन २०११-२०१२ मध्ये २८, सन २०१२-२०१३ मध्ये ६१, सन २०१३-२०१४ मध्ये ४५ व सन २०१४-२०१५ मध्ये ५२ गावांमध्ये सदरची योजना राबविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पशुसंवर्धन विभागाच्या राज्यस्तरावरील पशुधन पर्यवेक्षकांची रिक्त पदे भरण्यबाबत**

**(२०) ५८२२ (०४-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पशुसंवर्धन विभागाच्या राज्यस्तरावरील पशुधन पर्यवेक्षकांची रिक्त पदे गेली १३ वर्षापासून भरण्यात आलेली नाहीत हे खरे आहे काय, असल्यास त्याची कारणे काय आहेत,
(२) धुळे तालुक्यातील राज्यस्तरावरील श्रेणी-२ च्या २१ संस्थापैकी संस्थाप्रमुख पशुधन पर्यवेक्षकांची १३ पदे व परिचरांची १७ पदे रिक्त आहेत हे खरे आहे काय,
(३)असल्यास सदरहू रिक्त पदे भरण्यात येणार आहेत काय,
(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यस्तरीय पशुधन पर्यवेक्षकांची ८२ रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत शासन मान्यता प्राप्त असून, भरती प्रक्रिया आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,पुणे यांचमार्फत राबविणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

राज्यस्तरीय गट-ड कर्मचाऱ्यांची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबतची कार्यवाही आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचेकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे तालुक्यातील गावपातळीवरील आणि सामुहिक नळपाणी पुरवठा योजनांकडे महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीची वीज बील थकित असल्याबाबत**

**(२१) ५८२५ (०७-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील अनेक गावपातळीवरील आणि सामुहिक नळपाणी पुरवठा योजनांकडे महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीची वीज बील थकित असल्याने वीज कंपनीकडून विद्युत पुरवठा बंद करण्यात येत आहे. धुळे तालुक्यातील संपूर्ण गावांमध्ये ५० पैसे पेक्षा कमी आणेवारी असून माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे उध्वस्त झालेले शेतकरी पाणी पुरवठा योजनांची पाणीपट्टी भरण्यास सक्षम असल्याने थकबाकीत वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वी महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मार्फत राबविण्यात आलेली अभय योजना पुन्हा सुरु करुन नळपाणी पुरवठा योजनांची थकित वीज बील सोयीस्कर रित्या भरता येईल यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२०-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत शासनाकडून ज्या नळ योजनांची वीज देयके ग्रामपंचायतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला अदा केली आहेत. त्या रक्कमेच्या ५० % रक्कम, प्रोत्साहन अनुदान स्वरुपात लगतच्या पुढील वर्षी प्रतिपूर्ती करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-आग्रा महामार्गाचे चौपदरीकरण होऊन सुध्दा सोनगीर-धमाणे येथे मोठया प्रमाणात अपघात होत असल्याबाबत**

**(२२) ५८४२ (०९-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हा मुंबई-आग्रा महामार्गाचे चौपदरीकरण होऊन सुध्दा सोनगीर-धमाणे या बारा किलोमीटर अंतरात विशेषतः धमाणे फाटा, राजधानी हॉटेल, देवभाने फाटा, सरवड फाटा, येथे मोठया प्रमाणात अपघात होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :** (१) होय.
(२) सदर अपघात हे प्रामुख्याने वाहतुक नियमांचे पालन (भरधाव वेगाने वाहने चालविणे) न केल्यामुळे झालेले असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाच्या उपलब्ध होणा-या रूपये १५ लक्ष पर्यंतच्या एकूण कामांपैकी ३३ टक्के नियुक्त काम वाटप समितीमार्फत मजूर संस्थांना देण्यासंदर्भात**

**(२३) ५८४६ (१०-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या उपलब्ध होणा-या रूपये १५ लक्ष पर्यंतच्या एकूण कामांपैकी ३३ टक्के कामे स्पर्धेशिवाय शासन नियुक्त काम वाटप समितीमार्फत मजूर संस्थांना देण्यासंदर्भात दिनांक १६ नोव्हेंबर, २००६ च्या शासन निर्णयाद्वारे स्पष्टपणे आदेश दिले गेलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ च्या शासन निर्णयामुळे ३ लक्षच्या पुढील शासकीय साधन साहित्य खरेदीच्या कामासाठी ई-टेंडरींग बंधनकारक केले गेलेले असल्यामुळे मजूर संस्थांना विनानिविदा ३३ टक्के काम मिळण्याच्या हक्कावर बंधने आली असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन याबाबत स्पष्ट निर्देश निर्गमित करणार आहेत काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०५-२०१५) :**(१) होय. हे खरे आहे.
(२) नाही.
(३) व (४) शासनामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २४/४/२०१५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांसाठी मंजूर सहकारी सस्था व सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या कामांसाठी सदर कामे संबंधित गटातील पात्र सदस्यांमध्ये स्पर्धात्मक निविदा बोलावून देण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

---

**खान्देश वैधानिक मंडळाची स्थापना करण्याबाबत**

**(२४) ५८५७ (०९-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १३ जुलै, २००६ रोजी खान्देश वैधानिक मंडळाची स्थापना व्हावी यासाठी विधानसभेत ठराव मंजूर होऊन देखील आजतागायत त्यावर पुढे कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही असे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खान्देशाचा सर्वागीण विकास होण्याच्या दृष्टीने सदर वैधानिक मंडळांची स्थापना होण्यासाठी शासन तातडीने काही पावले उचलणार आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०५-२०१४) :** (१), (२) व (३) दिनांक १३ जुलै, २००६ रोजी महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी धुळ, नंदुरबार, जळगाव, नाशिक व अहमदनगर या ०५ जिल्हयाचा समावेश असलेल्या उत्तर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याबाबत एकमताने ठराव पारित केला. त्यानुसार सदर ठराव दिनांक २६ फेब्रुवारी २००७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास पाठवून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) (अ) मध्ये दुरुस्ती करण्याबाबत विनंती करण्याबाबत विंनती करण्यात आली. तद्नंतर दिनांक १९ डिसेंबर, २०११, १५ जुलै, २०१३, ०८ जुलै, २०१४ व १२ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रांन्वये उत्तर महाराष्ट्राकरिता स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याबाबत आवश्यक कार्यवाही होण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

**धुळे जिल्हयातील साक्री येथील रायपूर गावाजवळ मालट्रक बस थांब्याला धडकवून झालेला अपघात**

**(२५) ५८६३ (०७-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील साक्री येथील रायपूर गावाजवळ गोमांसाची विनापरवाना वाहतूक करणारा मालट्रक बस थांब्याला धडकून झालेल्या अपघातात अनेक जण जखमी झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी दोषी व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :**(१) दि.१७.१.२०१५ रोजी धुळे जिल्हयातील निजामपूर-साक्री मार्गावर रायपूर गाजाजवळ विनापरवाना गोमांस वाहतूक करणारा मालट्रक थांब्यास धडकून अपघात झाला आहे. तथापि, त्यामध्ये कोणीही जखमी झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) या प्रकरणी निजामपूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६/२०१४, भा.दं.वि.सं. कलम २६९, २७८, २७९, ४२७, ३४ सह मो. वा. का. कलम १८४, १२३/१७७ आणि महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७९ चे कलम ७, ९ नुसार गुन्हा दाखल केला असून गुन्हयातील ६ आरोपींना अटक केली असून सध्या गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर लोणावळा परिसरात लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(२६) ५८८७ (०६-०४-२०१५). प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर लोणावळा परिसरात अवघ्या १५ मिनिटांच्या कालावधीत लुटमारीच्या दोन घटना डोंगरगाव येथील द्रुतगती महामार्गाच्या पुलावर घडल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले तसेच लुटमारीच्या घटनांवर आळा बसण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१५) : (**१) लोणावळा शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत स्टेशनच्या हद्दीत दि. २३.११.२०१४ रोजी लुटमारीच्या दोन घटना १५ मिनिटाच्या अंतराने घडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) या प्रकरणी लोणावळा शहर पोलीस ठाणे येथे, गु.र.नं. १५७/२०१४, भा.दं.वि.सं. कलम ३९५, सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ चे कलम ३ (ii), ३(४) प्रमाणे दि. २३.११.२०१४ रोजी गुन्हा दाखल केला आहे. घटनेतील ६ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून रु. ५६,५६०/- किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. प्रकरणाचा अधिक तपास सुरु आहे.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर व जुने पुणे - मुंबई महामार्गावर लुटमारीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पुणे ग्रामीण पोलीस कार्यक्षेत्रामध्ये जास्तीत जास्त पोलीस कर्मचारी दिवसा व रात्री शस्त्रासह पेट्रोलिंगसाठी नेमले जातात. तसेच, पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर व जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर गुन्हेग्रस्त ठिकाणी पोलीस चौकया ठेवण्यात आलेल्या असून तेथे पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या मार्गावर लुटमारीच्या घटना घडू नयेत याकरीता सर्वतोपरी दक्षता घेण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) या ठिकाणी पर्यटन स्थळ घोषित करुन विकास आराखडा तयार करण्याबाबत**

**(२७) ५८९८ (०६-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) हे राष्ट्रमाता जिजाऊ यांचे जन्मस्थळ असून या ठिकाणी पर्यटन स्थळ घोषित करुन त्याचा विकास आराखडा तयार करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी सदरहू ठिकाणी विकास आराखडा तयार करण्याबाबत केलेल्या घोषणेनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१५) :** (१) होय.

(२) सदरचा आराखडा तयार करण्यासाठी कन्सल्टंट (क्रिएटिव्ह सर्कल, नागपूर) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सविस्तर आराखडा तयार करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने मागासवर्गीयांना खुल्या जागांचा लाभ घेता येणार नाही असा निर्णय घेतल्याबाबत**

**(२८) ५९५८ (०८-०४-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने राज्यातील मागासवर्गीयांना खुल्या जागांचा लाभ घेता येणार नाही असा अन्यायकारक निर्णय घेतल्याचे माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अन्यायकारक निर्णयाबाबत राज्यभरात तीव्र पडसाद उमटून मागासवर्गीय संघटनांनी या निर्णयाला विरोध केला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अन्यायकारक निर्णय रद्द करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१५) :** (१) होय,

महाराष्ट्र लोकसेवा आयेगाच्या यापुढे घेतलया जाणा-या परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयांना देय असलेली वय/परीक्षा शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसदर्भात सवलत उमेदवारांने घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही, अशा निर्णय घेण्यात असल्याची घोषणा आयोगाने दिनांक १९/९/२०१४ रोजी केली.

(२) होय,

(३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या निर्णयाच्या अनुषंगाने याबाबतीतील केंद्र शासनाचे धोरण, केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून अवलंबिली जाणारी कार्यपध्दती याचा सर्वंकष विचार करुन यासंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

---

### पिंपळगाव-नाशिक-गोंदे सहापदरी महामार्गावरील अपूर्ण कामांबाबत

**(२९) ५९७६ (१०-०४-२०१५). श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव-नाशिक-गोंदे सहापदरी महामार्गावरील विविध अपुर्ण कामांमुळे तसेच लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या उपाययोजना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या लालफितीतील कारभारात अडकल्यामुळे नाशिक शहरात द्वारा सर्कल, इंदिरानगर इत्यादी ठिकाणी वाहतुक कोंडी होत असल्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नाशिक शहरातील महमार्गावरील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

द्वारका सर्कल व इंदिरा नगर जंक्शन येथील वाहतुक कोंडी सोडविण्याकरीता मंजूर निविदा मध्ये अंतर्भुत नसलेली कामे अतिरिक्त बाब म्हणून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत पुर्ण करण्यात आली आहेत.

तसेच इंदिरा नगर जंक्शन येथील वाहतुक समस्या सोडविण्यासाठी कामाचा प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचेकडे मंजूरीस्तव सादर करण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औद्योगिक क्लस्टर विकास कार्यक्रमांतर्गत येवला (जि.नाशिक) येथे कृषी अवजारांचे क्लस्टर उभारण्याबाबत

**(३०) ५९८५ (१०-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक क्लस्टर विकास कार्यक्रमांतर्गत येवला (जि.नाशिक) येथे जरदोंझी व अंदरसुल (जि.नाशिक) येथे कृषी अवजारांचे क्लस्टर उभारण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राने माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये व त्या दरम्यान शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी अवजारांचे उत्पादन करणारे शेतकरी व जरदोझी कारागीरांना सामुदायिकरित्या व्यवसाय करण्यासाठी सदर क्लस्टर तयार करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जरदोसी क्लस्टर, येवला, जि.नाशिक व ॲग्रो इक्विपमेंट क्लस्टर, अंदरसुल, (जि.नाशिक) यांचा निदानोपयोगी अभ्यास अहवाल (DSR) जिल्हास्तरीय औद्योगिक समूह संनियंत्रण समितीच्या शिफारशीने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये उद्योग संचालनालयास प्राप्त झाला.

विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय औद्योगिक समूह संनियंत्रण समितीने दिनांक ८.१.२०१५ रोजी जरदोसी क्लस्टर, येवला, जि.नाशिक व ॲग्रो इक्विपमेंट क्लस्टर, अंदरसुल, जि.नाशिक या प्रकल्प प्रस्तावांना अनुक्रमे रु.८.०१ लाख व रु.७.३५ लाख रकमेच्या क्षमतावृध्दी कार्यक्रमास मंजूरी दिलेली असून यांतर्गत राज्य शासनाचे एकूण मंजूर देय अनुदान रु.७.३१ लाख व रु.६.७२ लाख इतके आहे. सदर प्रकल्पांस क्षमतावृध्दी कार्यक्रमासाठी राज्य शासनाचे प्रथम टप्प्यातील ६०% प्रमाणे अनुदान अनुक्रम रु.४.३९ लाख व रुपये ४.०३ लाख वितरीत करण्यासाठी दिनांक ३१.३.२०१५ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महानिर्मितीचे प्रकल्प उभारण्यासाठी सरासरीपेक्षा जास्त खर्च केला जात असल्याबाबत**

**(३१) ६०१५ (०४-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बच्चू कडू (अचलपूर), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विजनिर्मिती करणा-या महानिर्मिती या राज्य सरकारच्या कंपनीला भुसावळ येथे ५०० मेगावॅटच्या दोन संचांसाठी प्रति मेगावॅट पावणेसात कोटी रुपये इतका खर्च आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रशासनाच्या तसेच इतर कंपन्यांच्या विजनिर्मीतीत प्रति मेगावॅट साडेचार ते पाच कोटी रुपये इतका खर्च येत असताना राज्य शासनाच्या महानिर्मिती कंपनीला अधिक खर्च येण्याची कारणे काय आहेत,

(३) भुसावळ येथील प्रकल्प उभारण्यास २००६ मध्ये मंजूरी मिळाल्यानंतर हा प्रकल्प पुर्ण होण्यास सहा वर्षे लागण्याची कारणे काय आहेत,

(४) या प्रकल्पाचा खर्च १७५० कोटी रुपयांनी वाढल्यामुळे विजेच्या दरात मोठी वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकल्पाचा वाढलेला खर्च तसेच लागलेला विलंब यासाठी जबाबदार अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१५) :** (१) होय,

(२) बांधकाम कालावधीतील व्याज वाढ, प्रकल्प पूर्ण करण्याच्या निर्धारित कालावधीत किंमतीतील चढ उतार, मुख्य संयंत्र पुरवठा कार्यादेश किंमतीतील वाढ या कारणामुळे सदर प्रकल्पाच्या खर्चामध्ये वाढ झाली.

(३) सदर प्रकल्प पुर्ण होण्याच्या विलंबाची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

(अ) मुख्य संयंत्र तसेच उर्वरित संयंत्रांच्या कंत्राटदार यांच्याकडून उशीरा यंत्र सामुग्रीचा पुरवठा तसेच त्यांच्याकडे पुरेशे कुशल मनुष्यबळ व साधनसामुग्री नसणे.

(ब) मे.भेल या कंत्राटदाराकडून त्यांच्या उत्पादन क्षमतेपेक्षा अतिरिक्त आदेश स्विकारणे तसेच त्यांच्याकडून प्रत्यक्ष कामाच्या उभारणीसाठी उपकंत्राटदाराची उशीरा नेमणूक करणे.

(क) मे.टाटा प्रोजेक्टस यांचेकडून उर्वरित संयंत्र उभारणीसाठी स्थापत्य कामाची जागा उशीराने उपलब्ध करणे.

(ड) रेल्वे प्राधिकरणाकडून रेल्वे क्रॉसिंग करिता कल्वर्ट बॉक्स उभारणीसाठी परवानगी देण्यात उशीर होणे.

(ई) निकृष्ठ दर्जाचा व अपुऱ्या कोळसा पुरवठ्यामुळे या प्रकल्पाचे संचलन परिक्षण व वाणिज्यिक संचलन पुर्णत्व घोषित करण्यास विलंब होणे इ.

(४) नाही,

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील २७ हजार ग्रामपंचायतीमधील संगणक परिचारकयांच्या मागण्याबाबत**

**(३२) ६०३७ (०७-०४-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २७ हजार ग्रामपंचायतीमधील संगणक परिचारक (डाटा ऑपरेटर) दिनांक २८ जानेवारी, २०१५ पासून त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी मुंबई आझाद मैदान येथे उपोषणास बसले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संगणक परिचारकांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत,

(३) पैकी कोणकोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत,

(४) तसेच उर्वरित मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१५) :** (१) नाही.

तथापि दि.२ जानेवारी, २०१५ ते दि.२१ जानेवारी, २०१५ या कालावधीत काही संगणक परिचालक उपोषणास बसले होते.

(२) संगणक परिचालकांनी केलेल्या मागण्यापैकी प्रमुख मागण्या.

१) शासन सेवेत कायम घेणे.

२) महाऑनलाईन कंपनीशी केलेला करार रद्द करणे.

३) मासिक वेतन १०,०००/- मिळावे, इत्यादी.

(३) शासन परिपत्रक दि.२६ फेब्रुवारी, २०१५ नुसार संगणक परिचालकांचा मोबदला वाढविला आहे. संग्राम पकल्पावर कार्यरत संगणक परिचालक हे राज्यशासन, जिल्हा परिषद, पंचायत समिति व ग्रामपंचायत चे कंत्राटी अथवा कायम कर्मचारी नाहीत. हे गावपातळीवरील उद्योजक आहेत. त्यांना उद्दीष्टपूर्तीनुसार मोबदला तसेच नागरिकांना दिलेल्या सेवा/ दाखल्यातुन मिळणा-या शुल्कातुन विहीत रक्कम अनुज्ञेय आहे. सदर उपोषण दि.२१ जानेवारी, २०१५ रोजी मागे घेतले आहे.

---

**नांदेड जिल्हयात जनावरांच्या चा-याचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत**

**(३३) ६०८६ (०४-०४-२०१५). श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात जनावरांच्या चा-याचा तुटवडा निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार नांदेड जिल्ह्यातील जनावरांच्या चा-याचा प्रश्न सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या शाळांतील वर्ग खोल्यांच्या भिंतीला तडे गेल्याबाबत**

**(३४) ६११० (०६-०४-२०१५). श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. दिलीप सोपल (बार्शी), श्री. सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या २७४६ शाळांतील ८१३ वर्ग खोल्यांच्या भिंतीला तडे गेल्याचे जानेवारी २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर वर्ग खोल्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या २७८६ शाळांतील ८१३ वर्ग खाल्यांच्या भिंतीला तडे गेले नसून छप्पर दुरुस्ती, दरवाजे, खिडक्या, लादी बसविणे अश प्रकारची दुरुस्ती आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत गट शिक्षणाधिकारी यांचे मार्फत सदर शाळांची पाहणी करण्यात आली असून, जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत, ४ टक्के सदरील योजनेतंर्गत तसेच जिल्हा परिषद सेस अनुदानातून तातडीची दुरुस्ती आवश्यक असलेल्या वर्ग खोल्यांची छप्पर दुरुस्ती दरवाजे, खिडक्या, लादी बसविणे अशी दुरुस्ती टप्प्या टप्प्याने करण्यात आली आहे, उर्वरित वर्ग खोल्यांची दुरुस्ती प्राधान्य क्रमाने करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) आरोंदा येथील आंदोलनकर्ते, ग्रामस्थ, महिला यांचेवर पोलीसांनी लाठी हल्ला केल्याबाबत

**(३५) ६१११ (०७-०४-२०१५). श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) आरोंदा येथील आंदोलनकर्ते, ग्रामस्थ, महिला यांचेवर पोलीसांनी लाठी हल्ला केल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ च्या पहिलया सप्ताहात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर लाठीमार करणाऱ्या पोलिसांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) आंदोलनकर्ते, ग्रामस्थ, महिला यांचेवर पोलीसांनी कोणत्याही प्रकारे लाठीहल्ला केलेला नसल्याने त्याबाबत चौकशी करण्यात आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या संगणक परिचालकाचे वेतन वाढविणेबाबत**

**(३६) ६१२९ (०६-०४-२०१५). श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री. उल्हास पाटील (शिरोळ), श्री. चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री. चंद्रदीप नरके (करवीर), श्री. मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २० हजारापेक्षा जास्त असलेल्या ग्रामपंचायतींना १० कोटी ८० लाख रुपयाचा निधी केंद्र शासनाकडून दिला जात असतांना ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असणारे संगणक परिचालकाला केवळ ३,८०० ते ४,१०० एवढेच वेतन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वेतन कमी असल्याने तसेच अन्य मागण्याबाबत महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटनेने दिनांक १२ नोव्हेंबर २०१४ पासून काम बंद आंदोलन सुरु केले आहे, हे खरे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या संगणक परिचालकाचे वेतन वाढविणेबाबत तसेच अन्य मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१५) :** (१) ई-पंचायत प्रकल्पाची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून महाऑनलाईन मार्फत पंचायतीराज संस्थांना तांत्रिक मनुष्यबळ, कागद, टोनर, प्रशिक्षण, तंत्रज्ञान सहारूय व इतर अनुषंगिक सेवा पुरविल्या आहे. या सर्व सेवासाठी महाऑनलाईनला १ पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीकडून ८०००+ सेवा कर व १ पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ३ ग्रामपंचायती मिळून ८०००+ सेवा कर देण्यात येतो. ग्रामपंचायत पातळीवर डाटा एन्ट्रीसाठी नमण्यात आलेले संगणक परिचालक हे गावपातळीवरील उद्योजक आहेत. त्यांना त्यांनी केलेल्या डाटा एन्ट्रीच्या उद्दीष्टापूर्तीनुसार त्यांना महाऑनलाईनकडून मोबदला देण्यात येतो. तसेच दाखले व इतर सेवा मधून मिळणा-या सेवा शुल्कातूनही निधी प्रोत्साहनपर रक्कम संबंधित परिचालकाला मिळते.

(२) होय. तथापि सदर आंदोलन जानेवारी, २०१५ मध्ये मागे घेण्यात आले.
(३) शासन स्तरावर सर्व संबंधितांची बैठक घेवून याबाबत चर्चा केली.
(४) शासन परिपत्रक दि.२६ फेब्रुवारी, २०१५ नुसार उद्दीष्टपूर्ती करणा-या संगणक परिचालकांचा मोबदला दरमहा रु. ४५००/- इतका करण्यात आलेला आहे. सदर संगणक परिचालक हे गावपातळीवरील उद्योजक आहेत. ते राज्यशासन, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत चे कंत्राटी अथवा कामय कर्मचारी नाहीत. याबाबतचे सुस्पष्ट विवरण शासन निर्णय दि.२७ मे, २०१४ मध्ये करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खोपोलीतील प्रकल्पातून चिपळूण डेअरीतून आलेले दूध स्वीकारण्यास दिलेला नकार**

**(३७) ६१७९ (०४-०४-२०१५). श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे असलेल्या शासकीय दूध डेअरीमार्फत दूध संकलन करण्यात येवून संकलन केलेले दुध टँकरद्वारे खोपोली येथील प्रकल्पामध्ये जमा करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी गुणप्रत योग्य नसल्याचे कारण देवून खोपोलीतील प्रकल्पातून चिपळूण डेअरीतून आलेले दूध स्वीकारण्यास नकार दिल्याने तब्बल १,३०० लिटर दूध ओतून टाकावे लागले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार संबंधितानवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०५-२०१५) :** (१) होय.
(२) चिपळूण येथील शासकीय दूध योजनेत ८ प्राथमिक सहकारी दूध संस्थांनी पुरवठा केलेले १२२३ लिटर दूध कमी प्रतीचे आढळून आल्यामुळे व संबंधित संस्थांनी ते वेळीच परत न नेल्याने सदर दूधाची आम्लता वाढून ते नाश पावले. दुसऱ्या दिवशी दूध संकलनासाठी कॅनची आवश्यकता असल्याने सदरचे नासलेले दूध चिपळूण डेअरीत ओतून देण्यात आले.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडीमध्ये पोषण आहार पुरवनिणाऱ्या संस्थांना**
**निधीत वाढ करुन देण्याबाबत**

**(३८) ६१८० (०६-०४-२०१५). श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या बालकांना पोषण आहार पुरविण्यासाठी सदर आहार पुरविणाऱ्या संस्थेला शासनाकडून प्रति विद्यार्थ्यामागे ४.९२ रुपये दिले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तुटपुंज्या रक्कमेत मुलांना पोषण आहार पुरविणे संस्थांना कठीण जात असल्याने पोषण आहार पुरविण्यास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास पोषण आहार पुरविणाऱ्या संस्थांना पोषण आहार निधीत वाढ करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) केंद्र शासनाने मंजूर केलेली एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुर्नसंरचना या योजनेची राज्यातील वर्धा, नंदुरबार, बुलढाणा, नांदेड, गडचिरोली, चंद्रपूर, जळगांव, वाशिम, अहमदनगर, परभणी, धुळे, बीड, अमरावती, जालना, नागपूर, सांगली, मुंबई, हिंगोली, नाशिक व गोंदिया या २० जिल्हयात अंमलबजावणी करण्यास दि.३०/०४/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयाप्रमाणे वरील २० जिल्हयातील पुरक पोषण आहाराचा दर पूर्वीच्या रु. ४/- ऐवजी रु. ६/- केलेला आहे. पोषण आहारात केंद्र व राज्याचा हिस्सा ५०:५० या प्रमाणात असून दि. २६/०९/२०११ च्या शासन निर्णयान्वये राज्याच्या हिश्यामध्ये दि.०१/१०/२०११ पासून रु.१/- ने वाढ केलेली असल्यामुळे राज्याचा हिस्सा रु.३/- प्रमाणे देण्यात पूर्वीपासून देण्यात येत आहे. आता केंद्र शासनाकडून देखील रु.३/- प्रमाणे देण्यात येणार आहे.

---

**रत्नागिरी जिल्हयात सुमारे ३.२०कोटी रूपये किंमतीचा २४४९८.४६ मेट्रीक**
**टन तांदूळ सडत असल्याबाबत**

**(३९) ६१८१ (१०-०४-२०१५). श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात सुमारे ३.२० कोटी रूपये किंमतीचा २४४९८.४६ मेट्रीक टन भात तालुका खरेदी-विक्री संघांनी गतवर्षी खरेदी केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका खरेदी-विक्री संघाच्या ठिकठिकाणच्या गोदामामध्ये असलेला हा सर्व तांदूळ अक्षरशः सडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) भात पडून असतांना चालू वर्षी शासनाने रत्नागिरी जिल्हयाला भात खरेदीचे २७ हजार मे.टनचे उद्दिष्ट दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भात खराब होऊन वाया जाऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट (१६-०५-२०१५) :**(१) रत्नागिरी जिल्हयात २४४९८.४६ मेट्रीक टन नसून २४४९८.४६ क्विंटल भात तालुका खरेदी विक्री संघानी गतवर्षी खरेदी केलेला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) रत्नागिरी जिल्हयासाठी भात खरेदीसाठी उद्दिष्ट दिलेले नाही.
(४) रत्नागिरी जिल्हयामध्ये सन २०१३-१४ मध्ये खरेदी करण्यात आलेले एकूण २४४९८.४६ क्विंटल भात भरडाईविना शिल्लकअसून सदर शिल्लक धानाची जाहीर ई-लिलावाद्वारे विक्री करणेबाबतची कार्यवाही दि.१६ मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुरु आहे.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील देव्हारे परिसरामध्ये**
**बोटुलिझम या रोगाने ८ जनावरे दगावल्याबाबत**

**(४०) ६२१४ (०४-०४-२०१५). श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील देव्हारे परिसरामध्ये बोटुलिझम या रोगाने ८ जनावरे दगावली हे खरे आहे काय,
(२) या भयंकर रोगावर लस उपलब्ध नसल्याने पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून कोणतेही उपचार मिळत नाहीत आणि त्यामुळे शेतकरी भयभीत झाले आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रोगावर लस उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०५-२०१५) :**(१) माहे जानेवारी - फेब्रुवारी, २०१५ या कालावधीत बोटुलिझम सदृश्य रोगाने जनावरे दगावली आहेत. हे खरे आहे.
(२) अशी वस्तुस्थिती आढळून आलेली नाही.
(३) बोटुलिझम या रोगावर लस उपलब्ध नाही. तथापि, आहार व्यवस्थापनाअंती सदर रोगावर मात करता येऊ शकते. याबाबत, स्थानिक शेतक-यांना जनसंपर्क कार्यक्रमाद्वारे माहिती देण्यात येत आहे. अशा आजाराची जनावरांना बाधा झाल्याची बाब पशुसंवर्धन विभागाच्या निदर्शनास आणुन दिल्यास, नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थेकडून बाधीत जनावरांवर तात्काळ लक्षणारुप उपचार केले जातात.

---

**खेर्डी (ता.चिपळूण,जि. रत्नागिरी) येथे महाराष्ट्राचा रहिवाशी नसलेल्या व्यक्तींना अवघ्या दोन दिवसांत तहसिलदार कार्यालयाकडून शिधापत्रिका देण्यात आल्याचा घडलेला प्रकार**

**(४१) ६२१६ (०७-०४-२०१५). श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील खेर्डी ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये महाराष्ट्राचा रहिवाशी नसलेल्या व्यक्तींना अवघ्या दोन दिवसांत तहसिलदार कार्यालयाकडून शिधापत्रिका देण्यात आल्याचा प्रकार निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दलाल व अधिका-यांमधील आर्थिक संबंधातून अशी नियमबाह्य शिधापत्रिका दिली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंबंधात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद् नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथे सेशन कोर्टाची नवीन इमारत बांधण्याबाबत**

**(४२) ६२४७ (०७-०४-२०१५). श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथे सेशन कोर्टाची नवीन इमारत बांधून पूर्ण झाली ओह हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर इमारतीत कोर्टाचे कामकाज केव्हा सुरु करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०५-२०१५) :**(१) होय. पंढरपूर, जि.सोलापूर येथील नवीन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे. तथापि सदर इमारतीमधील संकीर्ण बाबी उदा. डायस प्लॅटफॉर्म संकीर्ण संरक्षण भिंत, स्ट्रॉगरुम दरवाजे इ.कामे प्रगतीत आहेत.

(२) व (३) सदर इमारतीत कोर्टाचे कामकाज सुरु करण्याची बाब ही सर्वस्वी मा.उच्च न्यायालय यांचे अखत्यारितील आहे. मा.उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार इमारतीच्या हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कोर्टाचे कामकाज सरु होईल.

---

**मोहोळ तालुक्यातील (जि.सोलापूर) सोलापूर ते भीमानगर या रस्त्याच्या चौपदीकरणाची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(४३) ६२४८ (१०-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ तालुक्यातील (जि.सोलापूर) सोलापूर ते भीमानगर हा १०१ कि.मी. लांबीचा रस्ता बांधा-वापरा व हस्तांतरित करा या (बीओटी) तत्वावर चौपदरीकरण करण्यात येत असून सदर प्रकल्पाचे काम ९०% झाले असून उर्वरित कामे जमिनीचा ताबा न मिळाल्यामुळे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची स्थापना करुन सदर कामे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान प्राधान्याने करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :** (१) होय.

जमिनीचा ताबा न मिळाल्याने काम प्रलंबित होते. सध्या सदर ठिकाणी जमिनीचा ताबा मिळाला असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सुधारीत नियोजनाप्रमाणे सदर कामे नोव्हेंबर २०१५ पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील मांडवगण फराटा येथील भैरु फराटेवाडी व जांभळी मळा येथील अंगणवाडी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी जागा नसल्याबाबत**

**(४४) ६२९९ (०७-०४-२०१५). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील मांडवगण फराटा येथील भैरु फराटेवाडी व जांभळी मळा येथील अंगणवाडी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी जागा नसल्याने झाडाखाली भरविली जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन अंगणवाडीच्या इमारतीसाठी वारंवार पाठपुरावा करुनही या ठिकाणी अंगणवाडी इमारती मंजूरी झाली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्ह्यातील ज्या अंगणवाड्यांना इमारत नाही अशा अंगणवाड्यांना तातडीने इमारत होणेबाबत शासन स्तरावरुन केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
शिरुर तालुक्यातील मौजे मांडवगण फराटा अंतर्गत भैरु फराटेवाडी येथील अंगणवाडी ही ग्राम पंचायतीने बांधलेल्या पत्राशेडमध्ये भरत आहे. तसेच जांभळी मळा येथे अंगणवाडी केंद्र मंजूर नाही.
(२) हे खरे नाही.
(३) शासन स्तरावरुन पुणे जिल्ह्याकरिता खालीलप्रमाणे विविध योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्रासाठी बांधकामे मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | वर्ष | मंजूर करण्यात आलेला निधी | अंगणवाडी इमारत बांधकामाची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा वार्षिक योजना सर्व साधारण योजना (DPC) २२३६११४१ लेखाशीर्ष | २०१०-११ | १६०४.०० लक्ष | ४०१ |
| २. | जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण योजना (DPC) २२३६११४१ लेखाशीर्ष | २०११-१२ | ६०३.०० लक्ष | १३४ |
| ३. | १३ वा वित्त आयोग | २०११-१२ | ४५०.०० लक्ष | १०० |
| ४. | जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण योजना (DPC) २२३६११४१ लेखाशीर्ष | २०१२-१३ | ६७५.०० लक्ष | १५० |
| ५. | जिल्हा वार्षिक योजना सर्व साधारण योजना (DPC) २२३६११४१ लेखाशीर्ष | २०१३-१४ | ९००.०० लक्ष | २०० |
| ६. | जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण योजना (DPC) २२३६११४१ लेखाशीर्ष | २०१४-१५ | १२००.०० लक्ष | २२५ |
| | | एकूण | ५४३२.०० लक्ष | १२१० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | आदिवासी उपयोजना (TSP-OTSP) लेखाशीर्ष २२३६१४१७ | २०१०-११ | २७.०० लक्ष | ६ |
| २. | आदिवासी उपयोजना (TSP-OTSP) लेखाशीर्ष २२३६१४१७ | २०११-१२ | १३९.५० लक्ष | ३१ |
| ३. | आदिवासी उपयोजना (TSP-OTSP) लेखाशीर्ष २२३६१४१७ | २०१२-१३ | १३५.०० लक्ष | ३० |
| ४. | आदिवासी उपयोजना (TSP-OTSP) लेखाशीर्ष २२३६१४१७ | २०१३-१४ | १४४.०० लक्ष | ३२ |
| ५. | आदिवासी उपयोजना (TSP-OTSP) लेखाशीर्ष २२३६१४१७ | २०१४-१५ | १८०. लक्ष | २८ |
| | | एकूण | ६२५.५० लक्ष | १२७ |

---

**कृषी शिक्षण व संशोधन परिषदेची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४५) ६३१७ (०७-०४-२०१५). श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या कृषी परिषद कार्यकारणीच्या उपाध्यक्ष पदापासुन जवळपास निम्या जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक महिन्यांपासून कार्यकारीणीची परिषदेची बैठकही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील चारही कृषी विद्यापीठाच्या कामकाजात समन्वय साधरण्यासाठी कृषी परिषदेची निर्मिती करण्यात आली खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेची रिक्त पदे भरणेबाबत शासन स्तरावरुन केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :** (१) होय. कृषी परिषदेच्या आस्थापनेवर एकुण ४१ पदे मंजूर असून सध्या १९ पदे रिक्त आहेत.

(२) नाही.

दि.१३.०२.२०१५ रोजी मा.मंत्री (कृषि) तथा अध्यक्ष, कृषि परिषद यांच्या अध्यक्षतेखाली ९० वी बैठक संपन्न झाली.
(३) होय.
(४) कृषि परिषद कार्यालयास सर्व संवर्गातील एकूण ४१ पदे मंजूर असून सदरची पदे कृषि विद्यापीठ व कृषि विभागातील कर्मचारी यांच्यातून प्रतिनियुक्तीने भरण्यात येतात. सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही कृषि परिषद स्तरावर सुरु आहे.

---

**पुणे बंगलोर राष्ट्रीय महामार्गावर कागल-सातारा दरम्यान उड्डाणपुल बांधण्याबाबत**

**(४६) ६३८२ (०९-०४-२०१५). श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे बंगलोर राष्ट्रीय महामार्गावर कागल-सातारा दरम्यान सहा अपघातप्रवण ठिकाणी उड्डाणपुल बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उड्डाणपुलाचे बांधकाम केव्हापासून सुरू करण्यात येणार आहे तसेच या उड्डाण पुलाला किती खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास, या पुलाचे काम त्वरित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील 'आरे' च्या कारखान्यात दूध व दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करण्याची पूर्ण क्षमता असूनही खासगी कंपन्यांकडून ई-निविदा मागविल्याबाबत**

**(४७) ६४३३ (०४-०४-२०१५). श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. सुभाष साबने (देगलूर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील 'आरे' च्या कारखान्यात दूध व दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करण्याची पूर्ण क्षमता असूनही दुधपुरवठा नाही हे कारण देत खासगी कंपन्यांना दुग्धजन्य पदार्थ उत्पादनांची कंत्राटे देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या दुग्ध व्यवसाय विकास विभागाने या पदार्थाच्या उत्पादनासाठी दिनांक २७ जानेवारी, २०१५ पर्यंत ई-निविदा मागविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील 'आरे' च्या कारखान्यात दूध व दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन करण्याची पूर्ण क्षमता असतांनाही यासाठी खाजगी कंपन्यांना विविध दुग्धजन्य पदार्थ उत्पादन करण्याची कंत्राटे देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०५-२०१५)** : (१) अतिरिक्त दूधाचे दूध भुकटीत रुपांतरण करण्यासाठी दूध भुकटी प्रकल्प भाडेतत्वावर घेण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.
(२) शासनाने अतिरिक्त दूधाचे दूध भुकटीत रुपांतरण करण्यासाठी दूध भुकटी प्रकल्प भाडे तत्वावर घेण्यासाठी दि.१४.१.२०१५ रोजी संकेत स्थळावर ई-निविदा प्रसिध्द केली आहे.
(३) शासनाकडे एकूण ४ दूध भुकटी प्रकल्प असून त्यापैकी नागपूर दूध भुकटी प्रकल्प, एनडीडीबी कडे वर्ग करण्यात आलेला आहे. अकोला येथे पाण्याची तीव्र टंचाई व दूधाची उपलब्धता अत्यंत कमी असल्याने तसेच मोठ्या प्रमाणावर यंत्रसामुग्रीच्या दुरुस्ती व देखभालीसाठी प्रकल्प बंद आहेत. मिरज येथील २ दूध भुकटी प्रकल्प जुने व यंत्रसामुग्री कालबाह्य झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर देखभाल व दुरुस्तीअभावी बंद आहेत. उदगीर येथील प्रकल्पातील यंत्रसामुग्री जुनी असल्यामुळे तसेच या प्रकल्पास होत असलेल्या अतिरिक्त उच्च दाबाच्या विद्युत पुरवठयामुळे दूध भुकटी प्रकल्प पुर्ण क्षमतेने चालविला जात नाही. शासनाकडील द्रवरुप दूधाची विक्री व इतर दुग्धजन्य पदार्थांची विक्री सुमारे १ लाख लिटर प्रतिदिन या मर्यादेत होत असल्यामुळे सहकारी क्षेत्रातील अतिरिक्त दूध शासकीय दराने खरेदी करुन दूध भुकटीत रुपांतरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यानुसार खाजगी दूध भुकटी प्रकल्प भाडेतत्त्वावर घेण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील परळ येथील पशुवैद्यकीय रूग्णालयातील कर्मचा-यांनी पगार वाढ व इतर मागण्यांसाठी केलेले आंदोलन

**(४८) ६४३४ (०४-०४-२०१५). श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. सुभाष साबने (देगलूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री. मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री. कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. अजय चौधरी (शिवडी), श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील परळ येथील पशुवैद्यकीय रूग्णालयातील सुमारे १५० कर्मचा-यांनी पगारवाढीसह इतर मागण्यांसाठी सार्वजनिक सुट्टी घेत दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास तीव्र आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कर्मचा-यांच्या कोणकोणत्या मागण्या आहेत व सदर मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) यासंदर्भात शासनाने अद्यापही कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबत सद्यःस्ती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१५) :** (१) होय.
(२) कर्मचा-यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने न्यासाने बैठक घेतली आहे. सदर बैठकीत मान्य केलेल्या मागण्यांबाबत युनियनशी करार करण्याची कायदेशीर प्रक्रिया न्यासाद्वारे चालू आहे.
न्यासाचा शासनाशी थेट संबंध येत नसल्याने शासनाचा हस्तक्षेप असत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पाणी टंचाईमुक्त करण्याकरिता जलयुक्त शिवार योजनेकरिता देण्यात आलेल्या तरतूदीबाबत**

**(४९) ६४४५ (०७-०४-२०१५). श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ. संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्रासाठी राबविण्यात येणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करुन त्यातील ६०० कोटी रुपये माहे जून २०२५ पर्यंत उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जलयुक्त शिवार अभियानाच्या आढावा बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपक्रमांतर्गत किती गावे वर्षभरात टंचाईमुक्त करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, राज्यात सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भातील सदयस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वर्षभरात ५००० गावे टंचाईमुक्त करण्यात येणार आहेत.
(३) अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(४) दिनांक १६ एप्रिल २०१५ अखेरे रु.५०२.६१ कोटी च्या निविदा प्रकाशित झालेल्या आहेत. तसेच ४७६९ गावांमध्ये १६१६९ इतकी कामे पुर्ण झाली असून १३३३४ कामे प्रगतीपथावर आहे.

---

**दाभोळ ग्रामपंचायतीच्या (ता.दापोली, जि.रत्नागिरी) सौर पथदिप बॅट-यांची चोरी झाल्याबाबत**

**(५०) ६५३६ (०७-०४-२०१५). श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री. तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभोळ ग्रामपंचायतीच्या (ता.दापोली, जि.रत्नागिरी) सौर पथदिप बॅट-यांची चोरी माहे सप्टेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास झाल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी दाभोळ सागरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) सदरची घटना नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) होय.

(३) १) पोलीस चौकशीत दाभोळ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.९/२०१४ भा.दं.वि. कलम ३७९, ४११, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशीत ७ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या रु.४२ हजार किंमतीच्या ७ सौर ऊर्जेवर चालणा-या बॅट-या हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. आरोपींविरुध्द दि.२३/०३/२०१५ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

२) पोलीस चौकशीत दाभोळ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १०/२०१४ भा.दं.वि. कलम ३७९, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशीत ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या रु.२४ हजार किंमतीच्या ३ सौर ऊर्जेवर चालणा-या बॅटच्या हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. आरोपींविरुध्द दि.१७/०३/२०१५ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

३) पोलीस चौकशी दाभोळ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२/२०१४ भा.दं.वि.कलम ३७९, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशीत ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या रु. १८ हजार किंमतीच्या २ सौर ऊर्जेवर चालणा-या बॅट-या हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. आरोपींविरुध्द दि.१७/०२/२०१५ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.